आजी/माजी सैनिकांना ग्रामपंचायत
मालमत्ता करातून सुट देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः व्हीपीएम-२०२०/प्र.क्र.९३/पंरा-४
बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ
फोर्ट, मुंबई - ४०० ००१
तारीखः १८ ऑगस्ट,२०२०

संदर्भ :- ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन अधिसूचना क्र.व्हीपीएम-२० १५/प्र.क्र.१४०/पंरा-४, दिनांक ३१ डिसेंबर, २०१५

प्रस्तावना-

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम ( १९५९ चा ३) कलम १२४ व त्याअंतर्गत महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी नियम,१९६० मधील तरतुदीनुसार पंचायतींना कर व फी आकारण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. तसेच वाचा येथील शासन अधिसूचनेन्वये सुधारित कर प्रणाली लागु केली आहे . सदर अधिसूचनेतील नियम ७ (४) (घ) मधील तरतुदीनुसार संरक्षण दलातील शौर्यपदक किंवा सेवापदक धारक व अशा पदा धारकांच्या विधवा किंवा अवलंबितांच्या वापरात आणल्या जाणाऱ्या फक्त एकच निवासी इमारतीस, करातून माफी देण्यात आली आहे . तथापि, आजी/माजी सैनिकांना ग्रामपंचायत मालमत्ता करातून सवलत देण्याबाबत कोणतीही तरतूद नसल्याने आजी/माजी सैनिकांनी त्यांना मालमत्ता करातून सुट देण्याबाबत शासनास विनंती केली होती . या पार्श्वभूमीवर ग्रामीण भागातील आजी/माजी सैनिकांना मालमत्ता करातून सुट देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम ( १९५९ चा ३) कलम १२४ व त्याअंतर्गत महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी नियम,१९६० मधील तरतुदीनुसार पंचायतींना कर व फी आकारण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रात वास्तव्य करणाऱ्या आजी/माजी सैनिकांनी देशासाठी प्राणाची बाजी लावून जिवाची पर्वा न करता नि: स्वार्थीपणे देशाचे संरक्षण करत/केले आहे. त्यांनी केलेली देशाची सेवा विचारात घेता सर्व आजी /माजी सैनिकांना भावनिक दिलासा व त्यांचे मनोबल उंचावून त्यांना उचित सन्मान देण्याच्या अनुषंगाने सर्व आजी /माजी सैनिकांना मालमत्ता करातून सुट देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे . अशा कर माफीस पात्र ठरणाऱ्या व्यक्तींनी जिल्हा सैनिक कल्याण अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने. ,

( ए.का.गागरे )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.राज्यपाल महोदय यांचे सचिव.

Scanned with CamScanner